# <u>युरोप २०१९</u>

## <u>इटली (व्हेनिस)</u>

इटलीचं आकर्षण मुख्यत्वे रोमन साम्राज्यविषयीच्या गूढ कुतूहलापोटी होतं! तिथल्या भव्यदिव्य वास्तू, पोपच्या वास्तव्यामुळे रोमला लाभलेले अध्यात्मिक वलय आणि त्यातूनच इटलीचं युरोपमध्ये वाढलेलं महत्त्व ह्या सगळ्या गोष्टी होत्याच व्हेनिस आणि रोमला भेट देण्यामागे!. इंग्लंड आणि स्वित्झर्लंड दोन्ही देश अतिशय शिस्तप्रिय तर इटली का कोण जाणे थोडा वाया गेलेला, हाताबाहेर गेलेल्या मुलासारखा मला आधीपासूनच वाटत होता. मनमुक्त जीवनशैली, शिस्तीबद्दल थोडा तिटकाराच अशी काहीशी मी कल्पना केली होती. आम्ही 'बासेल' विमानतळावर आलो आणि विमान तब्बल दोन तास उशिरा सुटेल असं तेव्हा सांगण्यात आलं कारण तिकडून सुटणारं विमान निघालंच नव्हतं. मला उगाच वाटलं आपली कल्पना बरोबरच असावी. शेवटी दुपारी २.३० वाजता विमानाने झेप घेतली आणि मी व्हेनिसचं आकाशातून दिसणारं रूप पाहायला आतुर झाले. एका तासातच उतरण्याचे संकेत मिळाले आणि मी आधीपासूनच खाली बघू लागले. अथांग समुद्रावरचा विहरणारा पक्षी कधी झाले कळलेच नाही. व्हेनिस विमानतळ समुद्राच्या अगदी बाजूलाच आहे त्यामुळे उतरतानाचे हे दृश्य खरोखरीच बघण्यासारखे आहे. मार्को पोलो विमानतळावरून आम्ही पिआझ्झे रोमा इथल्या बस स्टॉपकडे एका बसने निघालो. बाहेर लांब समुद्र, मधेच सुंदर हिरवीगार झाडं असा प्रवास करत एका मोठ्या चौकात पोचलो. इथे आम्हाला आमच्या airbnb च्या ऑफिस मधून घराच्या किल्ल्या घ्यायच्या होत्या. भल्यामोठ्या सूचना पाळत आम्ही ऑफिस शोधू लागलो. पण गूगलताई सांगत होत्या त्याप्रमाणे त्या ठिकाणी ऑफिस दिसत नव्हते. तब्बल १५/२० मिनिटांच्या अखंड शोधानंतर ते ऑफिस आणि किल्ल्या दोन्ही मिळाले. तोपर्यंत तिथल्या बस स्टॉप वरची गर्दी,गोंगाट पाहून स्वर्गातून पृथ्वीतलावर आपटल्याचा पूर्ण अनुभव घेता आला.



किल्ल्यांबरोबर वॉटरबसने घराकडे कसं जायचं याच्या सूचना घेत आम्ही एकदाचे जवळच्याच वॉटरबस स्टॉपला पोचलो. वॉटरबसच्या बोटीत चढलो. गर्दी होतीच, सामान बाजूला ठेवत स्वतःचा तोल सांभाळू लागलो. कारण ही बोट खरंच मनमौजीसारखी सागरावर आरूढ होऊन चालत होती. दरवाजा म्हणजे आपल्या कोकणातल्या बोटीसारखाच एक दांडा आडवा केला होता. स्टॉप आल्यावर एक माणूस तो बाजूला करे. तिकीट विचारायला कोणी येईचना, शेवटी त्या माणसाला विचारले तशी त्यानेच तिकिटाचे पैसे सांगून २ स्टॉप नंतर उतरायला सांगितले. जगतविख्यात रिअलटु-ब्रिज स्टॉप ला उतरलो. ब्रिजचे दर्शन व्हेनिसला पोचल्यापोचल्याच झाले. आता इथून पुढे खरी परीक्षा होती. आमच्या घराकडे जायचा रस्ता नकाशाने दाखवला होता. जवळचे सगळे चाकावरचे सामान पळवत आम्ही सांगितलेल्या बोळातून चालू लागलो. एकावेळी फक्त २ माणसं जाऊ शकतील अशा त्या बोळात माणसांची वाहती नदीच होती. प्रत्येक जण दुसऱ्याला वाट करून देत पुढे पुढे जात होता. इथे सायकल वगळता कुठल्याही प्रकारचे वाहन येऊच शकत नाही. एका मोठ्या चौकात पोचलो आणि सूचनांच्या चुकीमुळे पुढे कसे जायचे त्याबद्दल गोंधळ निर्माण झाला. मग सगळे एका चौकापाशी थांबलो आणि मी समोरच्या गल्लीतून पुढे जाऊन बघून यायचे असे ठरले. मी त्या गल्लीत शिरले पुढे गेल्यावर परत मागच्या चौकासारखेच दिसू लागले. कुठल्याही बाजूला वळले तरी सारखेच, वाटले मीच हरवून जाईन बहुदा. म्हणून जास्त धाडस न दाखवता पुन्हा सगळ्यांबरोबर येऊन रस्ता शोधू लागलो. हे अगदी खजिन्याचा शोध खेळासारखे चालू झाले होते. १५/२० मिनिटांच्या अथक चालीनंतर आमचे घर सापडले. जुन्या गिरगावच्या बोळकांडीतल्या चाळीसारखेच एकूण रूप होते बाहेरून. मळक्या पडक्या विटा, बाजूला काळ्या रंगातली नक्षी, जुने पुराणे पाईप्स, दगडी रस्ते. पहिल्या मजल्यावरच्या ह्या घराचे जिने जुन्या चित्रपटातल्यासारखे गोल गोल होते,पण मधेच तुटलेले! शेवटी एकदाचे घरी पोचलो. बाहेरून कल्पना नव्हती पण आतून घर नीटनेटके होते. आतापर्यंतच्या घरांमध्ये लहान म्हणता येईल, पण व्हेनिस मध्ये जमीन कमी आणि पाणी जास्त याचा अनुभव आल्याने ते पण प्रशस्त वाटू लागले. तासभर आराम केला, चहापाणी झाल्यावर संध्याकाळी बाहेर फिरून आजूबाजूचा परिसर बघून आलो. इथल्या गल्ल्या सगळ्या सारख्या दिसतात त्यामुळे जसे गेलो तसे येणे थोडे कठीणच होते. बऱ्याच दुकानाच्या खुणा लक्षात ठेवून, थोडीफार जेवायची सोय करून घरी येऊन निवांत गप्पा मारत जेवून झोपलो. दिवस तसा गडबडीचा होता. दुसऱ्या दिवशी उठून दिवसभराची एक क्रूज करायची होती.

सकाळी लवकर उठून आवरून छोट्या गल्लीबोळांची सैर करत आम्ही 'संतमार्को' चौकात पोचलो. क्रूजची वेळ ९.३० होती आणि आम्ही ९ लाच पोचलो त्यामुळे तिथे फिरायला ,फोटो काढायला बराच वेळ मिळाला.



छोटी दुकानं नुकतीच उघडत होती आणि भरपूर प्रवासी वस्तुंनी भरलेली बघून आमच्या खरेदीच्या योजना चालू झाल्या. दुकानदारांशी गप्पा मारताना जाणवले की इथे मुंबईसारखेच भाव कमी करावे लागतील, सगळे बोलबच्चन वाटत होते.

आमच्या बोटीची टूर गाईड आली आणि झेंडा फडकावून तिने सगळ्यांचे स्वागत केले आणि तिच्यामागून आमची वरात चालू लागली. १० मिनिटे चालत गेल्यावर एकदाची आमची बोट दिसली आणि सगळेच लहान मुलांच्या वरताण जागा पकडायला धावपळ करू लागले. बोटीच्या वरच्या भागात हवी तशी जागा मिळाल्यावर लक्षात आले की बोटीत भरपूर जागा होती आणि वाराही. सगळे स्थिरस्थावर झाल्यावर गाईडने ओळख करून देत व्हेनिस बद्दल थोडक्यात माहिती सांगितली आणि बोट मार्गक्रमणा करू लागली. हा समुद्रावरचा प्रवास बऱ्याच वर्षानंतर घडत असल्याने आम्ही सगळेच त्याची मजा घेत होतो. अर्ध्या पाऊण तासात आम्ही 'मुरेन' बेटावर पोचलो. तिथे एक काचकारखाना आणि दुकान आहे ते पाहायला गेलो. काचेच्या विविधरंगी वस्तू सुरेखच होत्या. त्या बनवण्याचे प्रात्यक्षिकही तिथे बघितले. बोटीचा पुढचा प्रवास 'बुरानो' बेटाचा होता. 'बुरानो' बेटावर संत मार्टिनो चर्चशिवाय तिथली सुंदर रंगीबिरंगी घर बघायला छान वाटले. साधारण ३ हजार वस्ती असलेलं हे कोळ्यांचे गाव आहे. ताजी मासळी प्रसिद्ध त्यामुळे खाण्याची चैन आहे इथल्या रेस्टॉरंट्समध्ये. इथून पुढे निघालो ते 'टॉरसल्लो' बेटाकडे. इकडे येण्यासाठी व्हेनिसमधल्या विविध ठिकाणाहून यायला वॉटर-टॅक्सिज पण उपलब्ध होतात. वॉटर ॲम्ब्युलन्स, वॉटर पोलीस-व्हॅन अशा सगळ्या सुविधा या बेटांवर आहेत. अतिशय शांत, समुद्राने

वेढलेलं, बहरलेल्या बेटांची सफर खूपच आनंददायी होती. समुद्रावरच्या गार वाऱ्याने सगळेच ताजेतवाने झाले होते.




घरी येताना वाटेत पिझ्झा खाणं अनिवार्य होतंच. थोडी विश्रांती घेऊन संध्याकाळच्या गोंडोला-राईडसाठी तयार झालो. ५.३० वाजता पोचायचं होतं. आम्ही त्या आधीच रिऑल्टो ब्रिजचं चित्र असलेले आमचे खास टी-शर्टस घालून तयार झालो.  आम्ही लवकरच पोचलो. आजूबाजूच्या लक्षवेधी वस्तू आणि वास्तू बघत, गर्दीत मिसळून त्या शहराचा एक भाग बनून गेलो. रमतगमत पोचलो तेव्हा कळले की आम्ही ज्याच्याकडे पैसे भरले होते तो माणूस सापडत नाहीये सांगितलेल्या ठिकाणी. त्याला शोधण्याचा प्रयत्न करू लागलो. तो उडवाउडवीची उत्तर देतोय असा लक्षात आल्यावर विनायकने त्याच्या ठेवणीतले शब्द आणि आवाज काढला तशी त्याने आमची सोय करून दिली. तेवढ्यातही आम्ही आमचे खास फोटो काढून घेतलेच. व्हेनिसच्या हवेतच ताण नाहीसा व्हायची जादू असावी. गोंडोलात बसायला मिळणार आणि अमिताभच्या त्या लोकप्रिय गाण्याची धून अनुभवता येणार म्हणून सगळे खुशीतच होतो. गोंडोलात चढलो, समुद्राच्या पाण्याचा खारट, गढूळ वास येऊ लागला, दमट हवा आणि बाजूने बंदिस्त अशा पाण्याच्या बोळातून आमची सैर चालू झाली. अतुलने लगेच ' दो दिन की है ये दिल की कहानी' ह्या गाण्यावर शीळ वाजवायला सुरवात केली. खूपच मजा येत होती. जाणारे येणारे पण ऐकून हात उंचावत होते. एका गोंडोलातल्या भारतीयांनी गाणे ओळखून हसत हसत अतुलला दादही

दिली. गजबजलेल्या भागातली ती सफर आम्हाला मात्र शांतपणे अनुभवता आली.



त्यानंतर आम्ही घरी येता येता खरेदी आणि नुसत्या भटकण्याचा आनंद मिळवला. इथे तसं भारतीयांचं प्रमाण कमी दिसलं. घर शोधणं आता कठीण वाटत नव्हतं, आता त्यात मजा होती. खूप गल्ल्यातून फिरलो, चुकलो, मागे वळलो आणि एकदाचे घरी पोचलो. दुसऱ्या दिवशी सकाळी वेगवान अशा ट्रेनचा प्रवास करायचा होता आणि भटकंतीतल्या शेवटच्या ठिकाणाकडे निघायचं होत.

व्हेनिसला नुकत्याच एका नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावं लागलं. समुद्राच्या अवाढव्य लाटेने व्हेनिस शहराला वेढून टाकलं होत. माध्यमांवरची दृश्यं बघून आम्ही त्या भीषणतेचा अंदाज लावत होतो. व्हेनिसचे झालेले नुकसान बघून वाईट वाटतं होते. परंतु तिकडच्या लोकांची 'दर्यादिली' अनुभवली असल्याने ते लवकरच ह्या संकटाचा सामना करतील अशी खात्रीही वाटली.

----संध्या रानडे